सत्यमेव जयते

# लोकशाही पंधरवडा-२०१९

## अहवाल

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

# पार्श्वभूमी

सन १९९२ मधील भारतीय संविधानातील ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतंत्र स्थानिक शासन म्हणून सांविधानिक मान्यता देण्यात आली आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या घेण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. या घटनेस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयावर दि. २ व ३ नोव्हेंबर २०१७ रोजी मा. राज्यपाल व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत मुंबई येथे एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती. तसेच यानंतर जानेवारी-२०१८ मध्ये वरील विषयाबाबत राज्यातील प्रत्येक विभागात विभागीय परिषदांचेही आयोजित करण्यात आलेले होते.

लोकशाहीची प्रक्रिया म्हणजे केवळ मतदान नव्हे. लोकशाही ही व्यापक संकल्पना आहे. त्यात निवडणूक हा महत्वाचा घटक आहे. त्या अनुषंगाने मतदार, राजकीय पक्ष, उमेदवार, शासन आणि निवडणूक आयोग यांच्यात अखंडपणे संवाद आणि समान्वयाची गरज असते. हा संवाद आणि समन्वय अधिकाधिक सुलभ होण्याच्यादृष्टीने निरंतर जनजागृती आणि लोकशिक्षणाची आवश्यकता असते, या लोकशाहीच्या घटकांमध्ये निवडणुकीनंतरही अखंडीतपणे सुरू असलेली समन्वयाची निरंतर प्रक्रिया असते, अशा अशयाचे प्रतिपादन या विविध परिषदांमध्ये मा.राज्यपाल महोदय व इतर नामवंत वक्ते, लोकप्रतिनिधी आदींनी केले होते.

विविध परिषदांमधील या विचारमंथनाच्या अनुषंगाने लोकशाही, निवडणुका व सुशासन या विषयावर सतत शिक्षणाच्यादृष्टीने दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला. त्यासंदर्भात दि. ६ जानेवारी २०१८ रोजी आदेश निर्गमित करण्यात आला होता. त्यानुसार सन २०१८ मध्ये पहिल लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला. सन २०१९ हे लोकशाही पंधरवड्याचे दुसरे वर्ष होते. त्याचा हा संक्षिप्त स्वरूपात वृत्तांत देण्याचा प्रयत्न केला आहे.



# पहिला लोकशाही पंधरवडा

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर सन २०१८ मध्ये विविध उपक्रमांद्वारे लोकशाही पंधरवडा पहिल्यांदा साजरा करण्यात आला होता. यात खालील बाबींचा समावेश होता:

- प्रजासत्ताक दिनी महानगरपालिका, जिल्हा परिषदांमध्ये मान्यवरांच्या भाषणात लोकशाही, निवडणुका व सुशासन या संबंधी उल्लेख करण्यात आला.
- विद्यापीठे व महाविद्यालयामध्ये लोकशाही, निवडणुका व सुशासन या विषयावर निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इमारतींच्या ठिकाणी लोकशाही पंधरवड्यासंदर्भात होर्डिंग्ज, बॅनर्स इ. प्रदर्शित करण्यात आले.
- प्रसिद्धिपत्रके, पत्रकार परिषदा, वृत्तपत्रातील लेख/ बातम्या आदींच्या माध्यमांतून लोकशाहीची त्रिस्तरीय रचना, नागरीक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदार्या याबाबत विचारमंथन झाले.
- पहिल्या लोकशाही पंधरवड्याचा समारोप 'गव्हर्नर कॉनक्लेव्ह''च्या माध्यमातून करण्यात आला होता. हा कार्यक्रम ९ फेब्रुवारी २०१८ रोजी मुंबई येथे मा. राज्यपाल व मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत पार पडला होता.
- लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भातील आयोगाचा तपशीलवार स्थायी आदेश जानेवारी २०१८ मध्ये निर्गमित झाल्यामुळे तयारीस पुरेसा वेळ नसतानाही स्थानिक स्तरावर उत्साहात विविध उपक्रम पार पडले.

मुंबई येथे राज्य निवडणूक आयोगातर्फे आयोजित लोकशाही पंधरवड्याचा समारोप समारंभास उपस्थित मा. राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया, राज्याचे मुख्य सचिव सुमित मल्लीक आणि पोलीस महासंचालक सतीश माथूर.



# दुसऱ्या वर्षी कृतिआराखडा

लोकशाही पंधरवड्याचे पहिल्या वर्षाचे अनुभव लक्षात घेऊन सन २०१९ मध्ये लोकशाही पंधरवडा अधिक परिणामकारक पध्दतीने साजरा करण्यासाठी ऑगस्ट २०१८ पासूनच पूर्वतयारी सुरू करण्यात आली होती. या पूर्वतयारीचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे आहे:

- सन २०१९ मध्ये साजरा करावयाच्या लोकशाही पंधरवड्यासंदर्भात कृतिआराखडा सादर करण्याबाबत आयोगाने १० ऑगस्ट २०१८ रोजीच्या पत्राद्वारे सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्तांना निर्देश दिले होते. त्याचबरोबर २९ नोव्हेंबर २०१८ व ४ डिसेंबर २०१८ रोजी दैनंदिन कार्यवाहीसंदर्भातही तपशीलवार निर्देश संबंधिताना देण्यात आले होते.
- विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या कृती आराखड्यावर १८ सप्टेंबर २०१८, १८ डिसेंबर २०१८, २१ डिसेंबर २०१८ आणि २६ डिसेंबर २०१८ या दिवशी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून मा. राज्य निवडणूक आयुक्त व आयोगाचे सचिवांनी विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त यांच्यासमवेत तपशीलवार चर्चा केली होती. यात आयोगाचे नॉलेज पार्टनर असलेले मुंबई विद्यापीठ, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे, सीएलजीएफ, आरएससीडी, एडीआर आदींदेखील सहभागी झाले होते.
- राज्य निवडणूक आयोगातर्फे ऑक्टोबर २०१८ मध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये लोकशाही, निवडणुका व सुशासन या विषयावर व्यापक चर्चा झाली. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाची कार्यकक्षा, अधिकार, कर्तव्ये, लोकशाहीची मूल्ये इत्यादींबाबतची माहिती सर्व सामान्यांपर्यंत पोहचविण्याच्यादृष्टीने लोकशाही पंधरवड्याबाबत नवीन कल्पना सूचविण्यात आल्या होत्या.
- राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयांच्या पातळीवरूनही वेळोवेळी तयारीसंदर्भात आढावा घेण्यात आला होता. त्यात आयोगाचे अधिकारी, नॉलेज पार्टनर्स, संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकांचे नोडल अधिकारी आदी सहभागी होत असत.
- स्थानिक पातळीवर लोकशाही पंधरवडा अधिक प्रभावीपणे साजरा करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान १५ जानेवारी २०१९ रोजीच्या आदेशान्वये वितरित केले होते. हे अनुदान महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी वापरण्याचे निर्देश होते.
- लोकशाही पंधरवड्याच्या कार्यक्रमाची स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिध्दी होण्याच्यादृष्टीने जानेवारीच्या दुसर्या व तिसर्या आठवड्यात महानगरपालिका क्षेत्रात संबंधित महापौर व आयुक्त; तसेच जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात जिल्हा परिषद अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांच्या संयुक्त पत्रकार परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रसिद्धिपत्रकाद्वारेदेखील लोकशाही पंधरवड्यातील उपक्रमांना व्यापक प्रसिध्दी देण्यात आली.
- लोकशाही पंधरवड्यातील उपक्रम अधिक प्रभावी राबविण्यासाठी समन्वय असणे आवश्यक होते. समन्वयातून उत्कृष्ट कल्पना, जिंगल्स, व्हिडिओ क्लिप्स इत्यादींचे आपसांत तात्काळ आदान-प्रदान व्हावे यादृष्टीने सर्व संबंधित नोडल अधिकारी यांचा एक व्हॉट्सप ग्रुप तयार करण्यात आला होता.
- राज्य निवडणूक आयोगाचे कार्यालय, नवीन प्रशासकीय भवनाचे प्रवेशद्वार, उपहारगृहे, मंत्रालयाचा परिसर, मंत्रालयाचे प्रवेशद्वार मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण, सचिवालय जिमखाना; तसेच नवीन प्रशासकीय भवनातील किऑक्स डिजीटल स्वरूपात माहिती देण्यात येत होती.



# उत्स्फूर्त प्रतिसाद

लोकशाही पंधरवड्यानिमित्त राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने ३० जानेवारी २०१९ व १२ फेब्रुवारी २०१९ च्या पत्राद्वारे विभागीय आयुक्त, महानगरपालिका आयुक्त व जिल्हाधिकार्यांना दिले होते. वसई-विरार, बृहन्मुंबई, मीरा-भाईंदर, भिवंडी, ठाणे, पनवेल, नांदेड-वाघाळा, अमरावती, मालेगाव व नवी मुंबई महानगरपालिका, नाशिक व नागपूर विभागीय आयुक्त कार्यालय, अकोला जिल्हाधिकारी; तसेच सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, गोंदिया येथील एस. एस. गर्ल्स कॉलेज यांनी उत्कृष्ट काम केल्याचे निदर्शनास आले.

- वसई-विरार महानगरपालिकेने अतिशय उत्स्फूर्तपणे नर्वीन्यपूर्ण उपक्रम राबविले. लोकशाहीचे स्वामित्व, राज्य निवडणूक आयोगाची कार्यकक्षा, राज्य निवडणूक आयोगाने केलेल्या निवडणूक सुधारणा आदींबाबत लक्षवेधी रांगोळी प्रदर्शन आयोजित केले होते. विविध लघुपटांचीही निर्मिती केली होती. सोशल मीडियावरून ते व्हायरल करण्यात आले. सर्वाधिक गर्दीच्या विरार व नालासोपारा या रेल्वे स्थानकांवर जिंगल्सदेखील वाजविण्यात आल्या.
- मुंबई महानगरपालिकेदेखील विविध स्वरूपात हो पंधरवडा साजरा केला. शहरात ठिकठिकाणी बॅनर्स लावण्यात आले होते. बँकांच्या शाखांमध्ये टोकन अनांऊसमेंटच्या वेळी जिंगल्स वाजविण्यात आल्या. हा एक नावींन्यपूर्ण उपक्रम ठरला.
- नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतर्फे राज्य निवडणूक आयोगाच्या माहितीसंदर्भात प्रजासत्ताक दिनी २६ जानेवारीला आकर्षक चित्ररथ तयार करण्यात आला होता. मतदार जागृतीसंदर्भातील आकर्षक संदेशदेखील एसएमएस व व्हॉट्सपद्वारे पाठविण्यात आले होते.
- पनवेल महानगरपालिकेचे कामकाज कसे चालते याबाबत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेटीद्वारे प्रशिक्षण दिले. तसेच अत्यंत आकर्षक पुस्तिकेच्या स्वरूपात लोकशाही पंधरवड्याचा अहवाल संकलीत केला आहे.

लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांना ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



# प्रसिद्धी साहित्य आणि उपक्रम

लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासाठी विविध प्रकारच्या उपक्रमांचा आणि प्रसिध्दी साहित्याचा वापर करण्यात आला. त्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत संदेश पोहचविण्याचा प्रयत्न झाला.

- प्रसिद्धिपत्रके/ पत्रकार परिषदा
- बॅनर्स/ होर्डिंग्स
- हस्तपत्रके/ स्टिकर्स
- छायाचित्रे, व्हिडीओ, ऑडिओ जिंगल्स
- माहिती पुस्तिका
- विद्यार्थ्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना भेटी
- विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र
- प्रजासत्ताक दिनाच्या भाषणांच्या माध्यमातून संदेश
- स्थानिक केबल व एफ.एम. रेडीओद्वारे प्रसिध्दी


पालघर येथे २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा

पालघर, दि. ११- जागरूक मतदार, लोकशाहीचा आधार हा विषय आधार मानून लोकशाही बाबत जागृती करण्याच्या अनुषंगाने येत्या २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत पालघर जिल्ह्यात लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. लोकशाही बळकट करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याने सर्वांनी या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

पालिकेतर्फे २६ पासून लोकशाही पंधरवडा

निवडणूक आयोगाचे सचिव विद्यापीठात म्हणाले, तरुणांनो प्रलोभनाला बळी पडू नका

सोलापूर विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात राज्य निवडणूक आयोगाचे सचिव किरण कुरुंदकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस व रवींद्र चिंचोलकर.

लोकशाहीवर श्रद्धा ठेवा

पालघर जिल्ह्यात लोकशाही पंधरवडा

२६ जानेवारी ते 10 फेब्रुवारीपर्यंत उपक्रमांचे आयोजन

## फलश्रुती

- पालघर- सिंधुदुर्ग पासून ते गडचिरोली-भंडार्यापर्यंत सर्वच जिल्ह्यांत आणि महानगरपालिकांपासून ग्रामपंचायतींपर्यंत शहराशहारांत व खेडोपाडी नियोजनबध्द पद्धतीने लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला.

- बहुतेक स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वच्छ सर्वेक्षण अभियान, रुबेला व पल्स पोलिओ लसीकरण मोहीम, मुंबई मॅरेथॉन, स्थानिक जत्रा आदी उपक्रम आणि लोकशाही पंधरवड्याच्या कार्यक्रमांची सांगड घातली. त्यामुळे व्यापक प्रमाणावर जनजागृती सहाय्य लाभले.

- भिवंडी व मालेगाव महानगरपालिकांनी पंधरवड्याचे उपक्रम उर्दू भाषेमध्येदेखील राबविले. त्यामुळे प्रभावीपणे नागरिकांपर्यंत लोकशाही बळकटीकरणाचा संदेश पोहचण्यास हातभार लाभला.

- यंदाच्या लोकशाही पंधरवड्यातील निवडक कार्यक्रम/ संकल्पनांचा समावेश पुढील वर्षीच्या (सन २०२०) लोकशाही पंधरवड्यामध्ये केल्यास हा उपक्रम अधिक प्रभावी व परिणामकारक होऊ शकेल.




लोकशाही पंधरवडानिमित्ताने खेडोपाडीदेखील जनजागृती करण्यात आली



## भविष्यातील नियोजन

- आगामी काही दिवसांत सप्टेंबर व ऑक्टोबर २०१९ मध्ये संबंधित यंत्रणा विधानसभा निवडणुकीच्या तयारीत व प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत व्यस्त असेल, हे लक्षात घेऊन सन २०२० मध्ये लोकशाही पंधरवड्याच्या पूर्वतयारीची सुरवात जुलै- ऑगस्ट २०१९ पासून करणे उचित ठरेल.
- पुढील वर्षी सन २०२० मध्ये राज्यभरात सुमारे १४,५०० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांमध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. यावरून महिलांच्या भूमिकेचे महत्व अधोरेखित होते. ही बाब विचारात घेऊन ''ग्रामपंचायत निवडणुकांतील महिलांची मध्यवर्ती भूमिका'' या विषयावर आगामी लोकशाही पंधरवडा साजरा करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी ग्रामपंचायत निवडणूक न्यारी...नारीची भूमिका लय भारी ! अशा आशयाचे घोषवाक्य उचित ठरले.
- ग्रामपंचायत निवडणुकांनंतर सन २०२१ मध्ये सुमारे १८० नगरपरिषदा/ नगरपंचायती व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांमध्ये पैशाचा व बळाचा दुरूपयोग या विरोधात मतदार जागृती करण्यासाठी  नका करू पैशात किंमत... आपले मत आपली ताकद! या विषयावर जनजागृती करणे उचित राहील.
- सन २०२२ मध्ये १८ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा व २८३ पंचायत समित्या; तसेच सुमारे ८००० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. ही बाब २०२२ मध्ये लोकशाही पंधरवडा साजरा करताना विचारात घ्यावी लागेल.
- मतदारांना उमेदवारांबाबत माहिती मिळावी व योग्य उमेदवार निवडले जावेत, या उद्देशाने राज्य निवडणूक आयोगाने मतदान केंद्राबाहेर, वर्तमानपत्रामध्ये; तसेच मोक्याच्या ठिकाणी मतदारांच्या माहितीसाठी उमेदवाराची आर्थिक स्थिती व गुन्हेगारी पार्श्वभूमी दर्शविणारे फ्लेक्स/ फलक लावले होते. हा उपक्रम मात्र मतदारांपर्यंत अद्याप पुरेशा स्वरूपात पोहचलेला नाही. त्याबाबतही मतदारांना अवगत करण्याची आवश्यकता आहे. कसा आहे आपला उमेदवार... जाणून घेऊन करा मतदान! अशी संकल्पना (थीम) निश्चित करून त्याखाली अधिक माहितीसाठी आपल्या मतदान केंद्रास भेट द्या अशी टॅग लाईन नमूद करून लोकशाही पंधरवडा निमित्ताने जनजागृती करायला हवी.

## चान्सलर्स इव्हेंट्सचा प्रस्ताव

मा. राज्यपाल महोदयांच्या पुढाकाराने राज्यातील सर्व विद्यापीठांच्या अधिनस्त महाविद्यालयांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून चान्सलर्स इव्हेंट्सचा उपमक्र राबविला जात आहे. यात लोकशाही पंधरवडा या कार्यक्रमाचा औपचारीक समावेश करण्याबाबत मा. राज्यपाल महोदयांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यास मान्यता मिळाल्यास आगामी काळात साजरा होणार्या लोकशाही पंधरवड्यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढू शकेल. त्यामुळे या उपक्रमास चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊन तो अधिकाधिक परिणामकारक होऊ शकेल.



## लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने राज्यभरात ठिकठिकाणी विविध उपक्रम राबविण्यात आले. त्याचीही काही प्रातिनिधीक छायाचित्रे
























झुंझलीस देशासाठी
राणी लक्ष्मीबाई बनुनी
तयार हो पुन्हा देश घडविण्या
निवडणूक लढवुनी
स्त्री शक्तीचा जागर, संविधानाचा आदर !


बदल घडवा,
दोष देत बसु नका
मतदान करा!
लोकशाही
पंधरवडा 2019
••• २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी •••
पनवेल महानगरपालिका
निवडणूक विभाग


بھیونڈی نظامپور شہر مہانگر پالیکا
پندرہ روزہ لوک شاہی
بتاریخ ۲۶ جنوری ۲۰۱۹ سے ۱۰ فروری ۲۰۱۹
%۱۰۰
فیصد کرو ووٹنگ یہی ہے
لوک شاہی کی ہے
شان


छोडकर सारे
काम
चलो करे
मतदान


नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
लोकशाही पंधरवाडा
दि. २६ जानेवारी २०१९ ते १० फेब्रुवारी २०१९
योग्य उमेदवाराची
निवड हीच
साक्षर मतदाराची
निवड!



लोकशाही पंधरवड्यानिमित्ताने वसई- विरार महानगरपालिकेतर्फे लक्षवेधक रांगोळी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.


















## State Election Commission

1st Floor, New Administrative Building,
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mumbai-32.
E-mail: sec.mh@gov.in
Website: https://mahasec.maharashtra.gov.in